महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन ज्ञापन क्र. अनुदा-०११९/प्र.क्र.१६०/पाच/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक १३ सप्टेंबर २०१९.

विषय :- गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, ८००, इतर खर्च, (००) (००)(१०) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण पोलीस प्रशिक्षण शाळेसाठी निवासी इमारतीचे बांधकाम करणे (४०७००२२२) (कार्यक्रम), ५३-मोठी बांधकामे, या तपशीलवर लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० या वित्तीय वर्षात अर्थसंकल्पित अनुदान खर्च करण्यास मंजुरी देण्याबाबत.

संदर्भ :-
1) शासन परिपत्रक, नियोजन विभाग, क्र. ससमा-२०१०/ प्र.क्र.४८(भाग-१)/ का.१४६१, दिनांक ११.०६.२०१८.
2) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/ प्र.क्र.९२/ अर्थ-३, दिनांक ०८.०७.२०१९.
3) पोलीस महासंचालक, म.रा., यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/ २७-अ/ अर्थसंकल्प/ वार्षिक-योजना/ २०-१९/ ७२/ २०१८, दिनांक २४.०६.२०१९.
4) पोलीस महासंचालक, म.रा., यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/ २७-अ/ अर्थसंकल्प/ वार्षिक-योजना/ २०-१९/ ७२/ २०१८, दिनांक १६.०७.२०१९.

ज्ञापन.

"महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम, २०१९" *(सन २०१९ चा महा. अधि. क्र.८)* हा महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, भाग चार, दिनांक ०४.०७.२०१९, यामध्ये प्रकाशित करण्यात आला आहे. गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, ८००, इतर खर्च, (००) (००)(१०) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण पोलीस प्रशिक्षण शाळेसाठी निवासी इमारतीचे बांधकाम करणे (४०७००२२२) (कार्यक्रम), ५३-मोठी बांधकामे, या तपशीलवर लेखाशीर्षाखाली रु.१४,००,००,०००/- (रुपये चौदा कोटी फक्त) इतकी तरतूद करण्यात आली आहे.

२. सन २०१९-२० या वित्तीय वर्षाच्या प्रथम नऊमाहीकरिता *(डिसेंबर २०१९ च्या अखेरपर्यंत)* आवश्यक असणाऱ्या अनिवार्य खर्च व कार्यक्रमांतर्गत खर्च यांचा अर्थसंकल्पीत निधी एकूण वार्षिक तरतुदीच्या ६० टक्के मर्यादेत अर्थसंकल्पीय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर वित्त विभागाकडून वितरित करण्यात आला आहे.

३. पोलीस महासंचालक, म.रा., यांनी उक्त तपशीलवार लेखाशीर्षाखाली मागील वित्तीय वर्षात (सन २०१८-१९) वितरित केलेल्या अनुदानाचे उपयोजन प्रमाणपत्र सादर केले असून चालू (२०१९-२०) वित्तीय वर्षात अर्थसंकल्पीत अनुदान वितरण करण्याची विनंती केली

आहे. तसेच, उक्त तपशीलवार लेखाशीर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही असे त्यांनी कळविले आहे.

४. त्या अनुसार, गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, ८००, इतर खर्च, (००) (००)(१०) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण पोलीस प्रशिक्षण शाळेसाठी निवासी इमारतीचे बांधकाम करणे (४०७००२२२) (कार्यक्रम), ५३-मोठी बांधकामे, या तपशीलवर लेखाशीर्षाखाली रु.८,४०,००,०००/- (रुपये आठ कोटी चाळीस लक्ष फक्त) इतकी रक्कम खर्च करण्यास, याद्वारे, पुढील अटींवर मंजुरी देण्यात येत आहे:-

१) पोलीस महासंचालक, म.रा., यांनी कामांचे प्राथम्य ठरवून काम निहाय निधी वाटप करावा. कामांचे प्राथम्य ठरवताना प्रथम अपूर्ण कामे व त्यानंतर नवीन कामे हा अग्रक्रम लक्षात घ्यावा.

२) वित्तीय साधनसंपत्तीचा विरळ प्रसार *(Thin spreading of financial resources)* होणार नाही याची काळजी घ्यावी.

३) महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका *(शा.नि., वित्त विभाग, विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५)* यांचे अनुपालन करण्यात यावे.

४) उक्त निधीचे उपयोजन प्रमाणपत्र शासनास (गृह विभाग) सादर करणे बंधनकारक राहील.

५. उक्त रु.८,४०,००,०००/- (रुपये आठ कोटी चाळीस लक्ष फक्त) इतकी रक्कम ही अर्थसंकल्पीय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर पोलीस महासंचालक, म.रा., यांना वितरित करण्यात आली आहे. हा निधी अहारित करुन संबंधितांना वितरण करण्यासाठी पोलीस महासंचालक, म.रा., यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. गृह (पोलीस) विभागाच्या निवासी व कार्यालयीन इमारतींची सर्व बांधकामे ही महाराष्ट्र राज्य पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित यांच्यामार्फत करण्यात यावी आणि त्या प्रयोजनासाठी खर्चाचे अंदाज व नकाशे यांना प्रशासकीय मान्यता किंवा, यथास्थिती, सुधारित प्रशासकीय मान्यता उक्त महामंडळाकडून प्रदान करण्यात येईल, असे निदेश शासन पत्र, गृह विभाग, क्र.बैठक-१११७/ प्र.क्र.५४७/ पोल-७, दिनांक १०.०५.२०१८, द्वारे देण्यात आले आहेत. म्हणून, पोलीस महासंचालक, म.रा., यांनी उक्त निधी आहरित करुन व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या., यांना द्यावा.

७. याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की,-

१) उक्त तपशीलवार लेखाशीर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही

२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/ प्र.क्र.९२/ अर्थ-३, दिनांक ०८.०७.२०१९, व त्याचे परिशिष्ट यांमधील संबद्ध अटींची पूर्ती झाली आहे.

८. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०९१३१४२२४००५२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad0118449
3f2735ad885627, postalCode=400032, street=2ND
FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI,
serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b9532
2e66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF
MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.09.13 14:28:34 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई.

प्रत-

१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
४) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
६) कार्यासन अधिकारी (अर्थसं-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) कार्यासन अधिकारी (व्यय-७/ अर्थ-३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) निवड फाईल, पोल-७.